सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे**

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,**
**मॉडेल कॉलनी , बहिरट पाटील चौक, शिवाजी नगर, पुणे -४११०१६**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/शै.वि.-४/२०२४/ 3253 दिनांक : 08 AUG 2024

**परिपत्रक/ महत्वाचे**

**प्रति,**
प्राचार्य/संचालक
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील
सर्व पदवी व पदव्युत्तर संस्था, पुणे विभाग.

**विषय : विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम २०२४ अंतर्गत मतदार नोंदणी वाढविणेबाबत.**

संदर्भ : १. उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) क्र.१३, पुणे यांचे कार्यालयाचे पत्र क्र.उभूसंक्र.१३/आस्था-१/कावि/९०/२०२४ दि.२२.०७.२०२४

२. मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र क्र.स्विप२०२४/प्र.क्र.९४४/२४/३३ दि.१२.०७.२०२४

संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त पुणे जिल्हयातील सर्व पदवी व पदव्युत्तर संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये शै.व.२०२४-२५ मध्ये प्रथमवर्ष व थेट द्वितीय वर्षात विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या सर्व विद्यार्थ्यांचे मतदार नाव नोंदणी करावयाची असल्याने त्यासाठी आपल्या संस्थेतील एका अधिव्याख्यात्याची नोडल ऑफिसर व एका विद्यार्थ्यांस मतदार ॲम्बॅसेडर(राजदूत) नेमावयाचे असून त्याबाबत प्राचार्याच्या सहीचे कार्यालयीन आदेश निर्गमित करण्यात यावेत. सर्व विद्यार्थ्यांची मतदार नाव नोंदणी दि.२०.०८.२०२४ पर्यंत प्राधान्याने करून घ्यावयाची जबाबदारी त्याच्यावर राहील.

मतदार नोंदणी अभियांनाबाबतची सविस्तर माहिती ropune.org.in या वेबसाईटवर ३१.०७.२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली असून सदर पत्रामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने गुगल शिट दिली आहे. आपण नेमलेल्या नोडल ऑफीसर व ॲम्बॅसेडर यांचे नाव व मोबाईल क्रमांक याची माहिती सोबत दिलेल्या गुगल फॉर्म मध्ये तात्काळ भरण्यात यावी. तरी देखील काही अडचण उद्भवल्यास या कार्यालयाचे श्री. एस.बी. वाघ, प्रोग्रॅमर मो.नं- ९९६०७४२१८४ यांच्याशी संपर्क करावा.

सोबत- गुगल फॉर्म

**( मा. रा. जाधव )**
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरिता.